- 8 JAN 2018
तरुण भारत
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठात 'गुगल'च्या माध्यमातून अँड्राईड डेव्हलपर्सची निर्मिती

## १५ रोजी गुगलच्या करारावर विद्यापीठ करणार डिजिटल सही : १ लाख ३० हजार विद्यार्थ्यांना मिळणार स्कॉलरशिप



- 'गुगल'मुळे विद्यापीठाच्या प्रगतीचा आलेख उंचावणार
- अँड्रॉईड प्रणालीच्या घटकांबाबत अभ्यासक्रम सुरु
- प्रशिक्षणानंतर विद्यार्थ्यांसाठी रोजगार निर्मिती

**प्रतिनिधी**
कोल्हापूर

बदलत्या तंत्रज्ञानामुळे स्मार्टफोन हा मानवी जीवनाचा अविभाज्य घटक बनला आहे. दैनंदिन जीवनात विविध मोबाईल ॲपचा वापर केला जातो. त्यामुळे नवनवीन अँड्रॉईड प्रणालीचे संशोधन करण्यासाठी शिवाजी विद्यापीठात 'गुगल'बरोबर करार करून अद्ययावत प्रयोग शाळा सुरू करण्यात येणार आहे. गुगलच्या माध्यमातून देशभरात ३ लाख अँड्रॉईड डेव्हलपर्सची निर्मिती केली जाणार आहे. दि. १५ रोजी डिजिटल सहीने 'गुगल'बरोबर विद्यापीठ करार करणार आहे.

इंटरनेटशी निगडीत सेवा, उत्पादने आणि तंत्रज्ञान पुरविणाऱ्या 'गुगल' कंपनीबरोबर करार करून तंत्रज्ञानाच्या अद्ययावत सुविधा पुरवण्यासाठी या कराराचा उपयोग होणार आहे. विद्यापीठातील संगणकशास्त्र विभागाचे प्राध्यापक, विद्यार्थ्यांना मोबाईल ॲप, नेव्हिगेशन, अँड्राईड प्रणाली आदी सुविधांबाबत प्रशिक्षण दिले जाणार आहे. प्राध्यापकांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना प्रशिक्षण देऊन रोजगार निर्मिती करून दिली जाणार आहे. या कराराच्या अनुषंगाने ऑक्टोबर २०१७ पासून विद्यापीठाकडून कार्यवाही सुरू झाली आहे. गुगलने विद्याशाखा विकास कार्यक्रमांची व्यवस्था केली आहे. विद्यापीठातील संगणकशास्त्र अधिविभागाने डॉ. आर. के. कामत यांच्या मार्गदर्शनाखाली शिवाजी विद्यापीठ संलग्न महाविद्यालयातील प्राध्यापकांसाठी 'अँड्राईड फंडामेंटल डेव्हलपमेंट' विषयावर फॅकल्टी डेव्हलपमेंट कार्यशाळेचे आयोजनही केले होते. या कार्यशाळेच्या माध्यमातून गुगलच्या तंत्रज्ञांनी प्राध्यापकांना मार्गदर्शन केले. संगणकशास्त्र विभागाने 'मास्टर इन कॉम्प्युटर सायन्समध्ये अँड्रॉईड प्रणालीच्या मूलभूत घटकांबाबतचा ६० तासांचा अभ्यासक्रम सुरू केला असून ६० विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला आहे.

'मास्टर इन कॉम्प्युटर सायन्समध्ये अँड्रॉईड प्रणालीच्या मूलभूत घटकांबाबतचा ६० तासांच्या अभ्यासक्रमाची व्हिडीओ ट्युटोरिअल्स, पुस्तके आदी शैक्षणिक साहित्य गुगलने उपलब्ध करून दिले आहे. या विभागाच्या समन्वयक म्हणून डॉ. कविता ओझा कार्यरत आहेत. अँड्रॉईड प्रणालीबाबत नवनवीन संशोधनासाठी अद्ययावत प्रयोगशाळा साकारणार आहे. या अभ्यासक्रमांतर्गत १ लाख ३० हजार विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती दिली जाणार आहे.

**विद्यापीठाच्या 'जागतिकीकरणाला' बळ**

विद्यापीठ जागतिक पातळीवर अव्वल क्रमांक मिळवण्यासाठी झेप घेत आहे. गुगलच्या माध्यमातून ही गगनभरारी घेण्यास मदत होणार आहे. अँड्रॉईड प्रणालीसह संगणकशास्त्रातील संशोधनासाठी गुगल उपयोगी ठरणार आहे. विद्यापीठाने तंत्रज्ञान व आयटी क्षेत्राशी निगडीत केलेल्या कार्याची दखल घेत गुगलने करार करण्याचा निर्णय घेतला आहे. गुगलच्या माध्यमातून संगणकशास्त्र विभाग जागतीक पातळीवर चमकणार आहे.

**लवकरच गुगलबरोबर करार होणार : डॉ. आर. के. कामत**

गुगलची लिंक आल्यानंतर डिजिटल सहीच्या माध्यमातून करारावर सही केली केली जाणार आहे. या उपक्रमांतर्गत प्राध्यापकांना प्रशिक्षण देऊन विद्यार्थ्यांना कशा प्रकारे मार्गदर्शन करायचे याविषयी माहिती दिली जाणार आहे. गुगल प्रयोगशाळेत सल्ला देणार आहे. गुगल नॅवीगेटर, गुगल क्लासरूम विद्यापीठाला देणार आहेत. गुगल ३ लाख अँड्राईड डेव्हलपर्स तयार करणार आहे. संगणक युगामध्ये हा उपक्रम चांगला आहे. यातून विद्यार्थ्यांना नोकरीची संधी मिळणार आहे. विद्यार्थ्यांचा चांगला प्रतिसाद मिळत आहे.


8 JAN 2018
तरुण भारत
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# गांधीजींनी शेतकऱ्यांचे संघटन केले

## ज्येष्ठ विचारवंत प्राचार्य आनंद मेणसे यांचे प्रतिपादन : शिवाजी विद्यापीठात 'गांधी समजून घेताना' विषयावर व्याख्यान

प्रतिनिधी
कोल्हापूर

देशाला राजकीय व सामाजिक स्वातंत्र्य मिळविण्यासाठी येणाऱ्या अडचणी महात्मा गांधी यांच्या लक्षात आल्या. देशातील सुमारे ८० टक्के शेतकरी जनतेच्या वाचा फोडण्याचा निर्णय घेतला. त्यासाठी महात्मा गांधींजींनी प्रथमतः चंपानेरचा नीळ सत्याग्रह उभारला. या माध्यमातून शेतकऱ्यांच्या प्रश्नावर शेतकऱ्यांचे संघटन केले. देशातील एकंदरीत परिस्थितीचा अभ्यास करून भारतीय स्वातंत्र्य लढ्याला कल्पकतेने कृती कार्यक्रम दिला, असे प्रतिपादन ज्येष्ठ विचारवंत प्राचार्य आनंद मेणसे यांनी केले.



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील आयोजित व्याख्यानात बोलताना ज्येष्ठ विचारवंत प्राचार्य आनंद मेणसे. सोबत डॉ. मेघा पानसरे.**

शिवाजी विद्यापीठातील इतिहास अधिविभाग व विदेशी भाषा विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित व्याख्यानात ते बोलत होते. 'गांधी समजून घेताना...' असा त्यांच्या व्याख्यानाचा विषय होता. अध्यक्षस्थानी इतिहास अधिविभाग प्रमुख डॉ. नंदा पारेकर होत्या. विद्यापीठातील मराठा इतिहास संशोधन केंद्रात व्याख्यान झाले.

डॉ. मेणसे म्हणाले, दक्षिण आफ्रिकेमधून १९१५ मध्ये भारतात आल्यानंतर महात्मा गांधी यांनी गुरु गोपाळकृष्ण गोखले यांच्या आवाहनानुसार देश समजून घेतला. अन्न, वस्त्र, निवारा यांसारख्या मूलभूत गरजांपासूनही लोक वंचित असल्याचे त्यांच्या लक्षात आले. तत्कालिन परिस्थिती लक्षात घेवून त्यांनी अहिंसेच्या मार्गाने लढा उभारला. त्याचप्रमाणे १८५७ च्या लढ्यानंतर ब्रिटीश सरकारने इंडियन आर्म्स एक्ट, १८५८ आणला होता. या कायद्यामुळे संपूर्ण देश निःशस्त्र झाला होता. या परिस्थितीचे भान गांधींना होते. त्यामुळेच त्यांनी जनतेकडून एखादा कार्यक्रम कसा यशस्वी करून घ्यायचा याचे धोरण आखले. व्यापक लोकसहभाग मिळविण्यासाठी गांधीजींचे हे धोरण कमालीचे यशस्वी ठरले. पुढे टप्प्याटप्प्याने स्वातंत्र्यलढ्याची व्याप्ती आणि आवेग वाढवत नेऊन अखेर १९४२ मध्ये त्यांनी ब्रिटीशांना निर्वाणीचा इशारा दिला.

राजकीय स्वातंत्र्याच्या संदर्भात टिळकांनी सनातन भूमिका घेतली असताना महात्मा गांधींनी काँग्रेसला सामाजिक भूमिका घेण्यास प्रवृत्त केले. महात्मा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या सामाजिक कार्यक्रमाशी महात्मा गांधी यांचा सामाजिक कार्यक्रम मिळताजुळता होता. अस्पृश्यता निवारण, मंदिर प्रवेशाच्या चळवळी केल्या. महिला, दलित यांना मताचा अधिकार असलाच पाहिजे, अशी भूमिका त्यांनी मांडली. १८६०च्या दुष्काळानंतर आफ्रिकेत स्थलांतरित झालेल्या भारतीयांना संघटित करून त्यांना केवळ वर्णद्वेषातून मिळणाऱ्या वाईट वागणुकीविरुद्ध प्रतिकार केला. त्यांच्यावर लादलेला २५ पौडांचा कर संघर्ष करून १२ पौडांपर्यंत आणण्यास सरकारला भाग पाडले. भारतीयांसाठी असलेली हजेरीची प्रथा बंद पाडली. बनारस येथे डॉ. एनी बेझंट यांच्या अध्यक्षतेखाली भरलेल्या संस्थानिकांच्या अधिवेशनात, व्हॉईसरॉय लॉर्ड हार्डिंग यांच्या तोंडावर ब्रिटीशांनी देशातून निघून जावे, असे गांधीजींनी सांगितले होते, तर देशातील सर्व संस्थाने त्यांच्या संपत्तीसह देशात विलीन व्हावीत, असे संस्थानिकांना सुनावले होते.

विदेशी भाषा विभाग प्रमुख डॉ. मेघा पानसरे यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. डॉ. नीलांबरी जगताप यांनी आभार मानले.

- 8 JAN 2018
पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# गांधींकडून स्वातंत्र्य लढ्याला कल्पक कृती कार्यक्रम

## - प्राचार्य आनंद मेणसे


**कोल्हापूर / प्रतिनिधी :**

महात्मा गांधी यांनी भारतातील राजकीय व सामाजिक परिस्थितीचा सर्वंकष अभ्यास करून भारतीय स्वातंत्र्य लढ्याला अत्यंत विचारपूर्वक आणि कल्पकतेने कृती कार्यक्रम दिला. लोकसंग्रहाचे दुर्मीळ कसब तर त्यांच्याकडे होतेच; पण या देशातील जनतेच्या भाकरीचा विचार करणारे ते पहिले नेते होते, असे उद्‌गार विचारवंत प्राचार्य आनंद मेणसे यांनी काढले.

शिवाजी विद्यापीठाचा इतिहास अधिविभाग आणि विदेशी भाषा विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने मराठा इतिहास संशोधन केंद्रात प्राचार्य मेणसे यांचे 'गांधी समजून घेताना' या विषयावर व्याख्यान झाले.

प्राचार्य आनंद मेणसे म्हणाले, दक्षिण आफ्रिकेमधून १९१५ मध्ये भारतात परतल्यानंतर महात्मा गांधी यांनी गुरू गोपाळ कृष्ण गोखले यांच्या आवाहनानुसार देश समजून घेण्यास प्रारंभ केला. त्यातून या देशातील विदारक सामाजिक वास्तव त्यांच्या ध्यानी आले. अन्न, वस्त्र, निवारा यासारख्या मूलभूत गरजांपासूनही वंचित भारतीय समाजाचे दर्शन झाल्याने त्यांचे हृदय विदीर्ण झाले. या देशातील सुमारे ८० टक्के जनता शेतकरी आहे. त्यांचे प्रश्न गंभीर आहेत. त्यांना वाचा फोडायला हवी. म्हणून गांधींनी प्रथमतः चंपानेरचा नीळ सत्याग्रह उभारला.

या माध्यमातून शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर संघटन होऊ शकते, हे त्यांनी दाखवून दिले. १८५७ च्या लढ्यानंतर ब्रिटिश सरकारने इंडियन आर्म्स ॲक्ट १८५८ आणला. या कायद्यामुळे संपूर्ण देश निःशस्त्र झाला. या परिस्थितीचे भान गांधींना होते. त्यामुळेच त्यांनी जनतेला छोटा कार्यक्रम द्यायचा, त्यासाठी मोठी शक्ती लावायची आणि तो कार्यक्रम यशस्वी करायचा, असे धोरण ठेवले. व्यापक लोकसहभाग मिळविण्यासाठी गांधीजींचे हे धोरण कमालीचे यशस्वी ठरले. पुढे टप्प्याटप्प्याने स्वातंत्र्य लढ्याची व्याप्ती आणि आवेग वाढवत नेऊन अखेर १९४२ मध्ये त्यांनी ब्रिटिशांना निर्वाणीचा इशारा दिला.



'गांधी समजून घेताना' या विषयावर बोलताना प्राचार्य आनंद मेणसे.

गांधीजींच्या निर्भय व निर्भीडपणाचा दाखला देताना डॉ. मेणसे म्हणाले, बनारस येथे डॉ. ॲनी बेझंट यांच्या अध्यक्षतेखाली भरलेल्या संस्थानिकांच्या अधिवेशनात अवघी दोन मिनिटे बोलण्याची संधी मिळालेल्या गांधीजींनी त्या अवधीत व्हॉईसरॉय लॉर्ड हार्डिंग यांच्या तोंडावर ब्रिटिशांनी या देशातून शांतपणे निघून जावे, असे सांगितले होते. देशातील सर्व संस्थाने त्यांच्या संपत्तीसह देशात विलीन व्हावीत, असे संस्थानिकांना सुनावले होते. यापेक्षा निर्भयपणा दुसरा कोणता असू शकेल?

अध्यक्षीय भाषणात डॉ. नंदा पारेकर म्हणाल्या, महात्मा गांधी यांचे विचार व कार्य यांची प्रस्तुतता अजिबात कमी झालेली नाही, उलट वाढलेली आहे. त्यांच्याविषयी बुद्धिभेदी विखार पसरवणाऱ्या विखारी प्रवृत्तींना चपराक देण्यासाठी तरुणांनी गांधी विचार व तत्त्वज्ञानाचा वस्तुनिष्ठ अभ्यास करण्याची गरज आहे.

विदेशी भाषा विभागाच्या डॉ. मेघा पानसरे यांनी स्वागत, प्रास्ताविक व परिचय करून दिला. डॉ. नीलांबरी जगताप यांनी आभार मानले.

- 8 JAN 2018
पुण्यनगरी
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# गांधींकडून स्वातंत्र्य लढ्याला कल्पक कृती कार्यक्रम


## - प्राचार्य आनंद मेणसे

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**
महात्मा गांधी यांनी भारतातील राजकीय व सामाजिक परिस्थितीचा सर्वंकष अभ्यास करून भारतीय स्वातंत्र्य लढ्याला अत्यंत विचारपूर्वक आणि कल्पकतेने कृती कार्यक्रम दिला. लोकसंग्रहाचे दुर्मीळ कसब तर त्यांच्याकडे होतेच; पण या देशातील जनतेच्या भाकरीचा विचार करणारे ते पहिले नेते होते, असे उद्‌गार विचारवंत प्राचार्य आनंद मेणसे यांनी काढले.

शिवाजी विद्यापीठाचा इतिहास अधिविभाग आणि विदेशी भाषा विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने मराठा इतिहास संशोधन केंद्रात प्राचार्य मेणसे यांचे 'गांधी समजून घेताना' या विषयावर व्याख्यान झाले.

प्राचार्य आनंद मेणसे म्हणाले, दक्षिण आफ्रिकेमधून १९१५ मध्ये भारतात परतल्यानंतर महात्मा गांधी यांनी गुरू गोपाळ कृष्ण गोखले यांच्या आवाहनानुसार देश समजून घेण्यास प्रारंभ केला. त्यातून या देशातील विदारक सामाजिक वास्तव त्यांच्या ध्यानी आले. अन्न, वस्त्र, निवारा यासारख्या मूलभूत गरजांपासूनही वंचित भारतीय समाजाचे दर्शन झाल्याने त्यांचे हृदय विदीर्ण झाले. या देशातील सुमारे ८० टक्के जनता शेतकरी आहे. त्यांचे प्रश्न गंभीर आहेत. त्यांना वाचा फोडायला हवी. म्हणून गांधींनी प्रथमतः चंपानेरचा नीळ सत्याग्रह उभारला.

या माध्यमातून शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर संघटन होऊ शकते, हे त्यांनी दाखवून दिले. १८५७ च्या लढ्यानंतर ब्रिटिश सरकारने इंडियन आर्म्स ॲक्ट १८५८ आणला. या कायद्यामुळे संपूर्ण देश निःशस्त्र झाला. या परिस्थितीचे भान गांधींना होते. त्यामुळेच त्यांनी जनतेला छोटा कार्यक्रम द्यायचा, त्यासाठी मोठी शक्ती लावायची आणि तो कार्यक्रम यशस्वी करायचा, असे धोरण



'गांधी समजून घेताना' या विषयावर बोलताना प्राचार्य आनंद मेणसे.

ठेवले. व्यापक लोकसहभाग मिळविण्यासाठी गांधीजींचे हे धोरण कमालीचे यशस्वी ठरले. पुढे टप्प्याटप्प्याने स्वातंत्र्य लढ्याची व्याप्ती आणि आवेग वाढवत नेऊन अखेर १९४२ मध्ये त्यांनी ब्रिटिशांना निर्वाणीचा इशारा दिला.

गांधीजींच्या निर्भय व निर्भीडपणाचा दाखला देताना डॉ. मेणसे म्हणाले, बनारस येथे डॉ. ॲनी बेझंट यांच्या अध्यक्षतेखाली भरलेल्या संस्थानिकांच्या अधिवेशनात अवघी दोन मिनिटे बोलण्याची संधी मिळालेल्या गांधीजींनी त्या अवधीत व्हॉईसरॉय लॉर्ड हार्डिंग यांच्या तोंडावर ब्रिटिशांनी या देशातून शांतपणे निघून जावे, असे सांगितले होते. देशातील सर्व संस्थाने त्यांच्या संपत्तीसह देशात विलीन व्हावीत, असे संस्थानिकांना सुनावले होते. यापेक्षा निर्भयपणा दुसरा कोणता असू शकेल?

अध्यक्षीय भाषणात डॉ. नंदा पारेकर म्हणाल्या, महात्मा गांधी यांचे विचार व कार्य यांची प्रस्तुतता अजिबात कमी झालेली नाही, उलट वाढलेली आहे. त्यांच्याविषयी बुद्धिभेदी विखार पसरवणाऱ्या विखारी प्रवृत्तींना चपराक देण्यासाठी तरुणांनी गांधी विचार व तत्त्वज्ञानाचा वस्तुनिष्ठ अभ्यास करण्याची गरज आहे.

विदेशी भाषा विभागाच्या डॉ. मेघा पानसरे यांनी स्वागत, प्रास्ताविक व परिचय करून दिला. डॉ. नीलांबरी जगताप यांनी आभार मानले.